राष्ट्र ग्रंथ संग्रहालय

# बाळामीनानो

डा-क्र ३६५८

५१

IRBK-0103657

IRBK-0103657

पा-वा ३६५७

# बा ल मि त्रां नो !

शाळेचं संमेलन किंवा कोणता तरी उत्सव-सभारंभ जवळ आला म्हणजे एखादा सोपा, खुसखुशीत नाट्यसंवाद बसवावा, असं सहजच तुम्हांला वाटूं लागतं. तुमच्या ह्या हौसेला हातभार लावण्याच्या हेतूनंच हे सुटसुटीत, सुंदर संवाद आज मो तुमच्या हातीं देत आहें.

हे संवाद बसवितांना वेष-भूषेची किंवा साज-सजावटीची विशेष अडचण तुम्हांला भासणार नाहीं. शिवाय, ह्या नाटुकल्यांच्या प्रयोगांत तुमच्या पुष्कळ संवगड्यांना कामं करतां येऊन आपल्या अंगच्या अभिनयकलेनं छोट्यांप्रमाणंच मोठ्या मंडळीचीही घटकाभर छान करमणूक करणं तुम्हांला शक्य होईल.

'नाटक ... नाटक' च्या पहिल्या दोन भागां-प्रमाणंच ह्या तिसऱ्या भागाचंही तुम्ही उत्साहानं स्वागत कराल अशी आशा आहे.

सदाशिव अनन्त शुक्ल

IRBK-0103657

IRBK-0103657



शनिवारी
दुपारी तीन वाजता
पटवर्धनांच्या
वाड्याच्या पिछाडीस
मुख्य भूमिका
शुक्राचार्य: अशोक आठल्ये
कच: बाळासाहेब वटे
देवयानी: सरल साने

[ शुक्राचार्यांचा आश्रम. सेनापति व युवराज बोलत उभे आहेत.

**युवराज :** ( मोठ्यांदा हसून ) सेनापति, तुमच्या शक्तीनं आजवर साधलं नाहीं, तें आज आम्हीं युक्तीनं साधळं !

**सेनापति :** अजून साधलं असं म्हणूं नका युवराज ! कचाला जिवंत जाळून त्याच्या हाडांची राख आपण दारूंत मिसळली खरी ; पण ....

**युवराज :** पण काय ? एव्हांना ती दारू आचार्यांच्या पोटांत गेलीसुद्धां असेल !

[ 'दानवसम्राट् राजाधिराज वृषपर्वामहाराज' – अशी ललकार ऐकूं येते.

**सेनापति :** महाराजही आलेच !

[ दरबारी परिवारासह वृषपर्वा येतो. युवराज व सेनापति त्याला अभिवादन करतात.

**भालदार :** दानवसम्राट् राजाधिराज वृषपर्वामहाराज !

**वृषपर्वा :** ( युवराजास ) आचार्यांनीं मद्य घेतलं ?

[ इतक्यांत शुक्राचार्य येतात. त्यांच्या हातांत मद्याचा रिकामा पेला असतो.

**शुक्राचार्य :** वा ! फारच सुंदर आणि रुचकर !

**युवराज :** गुरुमहाराजांना मद्य आवडलं !

**वृषपर्वा :** फार संतोष झाला आम्हांला !

[ 'बाबा–बाबा' अशा हाका मारीत देवयानी धावत येते.

**देवयानी :** बाबा ! बाबा ! तुम्हीं कोणतं मद्य घेतलंत ?

**शुक्राचार्य :** कां बरं ? युवराजांनीं माझ्यासाठीं मुद्दाम बनविलेलं मद्य ! .... फारच तेजाळ .... मसालेदार !

**देवयानी :** घात झाला ! बाबा, घात झाला !

**शुक्राचार्य :** काय, काय झालं बाळ ?

**********************************************************

**********************************************

**देवयानी :** ह्या चांडाळांनीं कचदेवांना जिवंत जाळून त्यांची राख तुम्हांला त्या दारूतून पाजली कीं हो !

**शुक्राचार्य :** ( संतापानें पेला फेकून देऊन ) कचाची राख? युवराज! ....

**युवराज :** कुभांड ! निव्वळ कुभांड !

**शुक्राचार्य :** माझ्याशीं कपट? बोल, कच कुठें आहे? अधमा! तुझीं दुष्कृत्यं माझ्या दिव्य दृष्टीला दिसणार नाहींत असं का तुला वाटतं?

[ शुक्राचार्य ध्यानस्थ बसतात. जराशानें अंगाला झटके देऊं लागतात व समाधींतून उठतात. त्यांची मुद्रा भयंकर उग्र व संतप्त दिसते.

**शुक्राचार्य :** ( युवराजास ) चांडाळा! केव्हढं अघोर कर्म केलंस हें ! दारूतून मला कचाची राख पाजलीस !

**वृषपर्वा :** लेकराला क्षमा असावी ....

**युवराज :** केवळ साम्राज्याच्या हितरक्षणासाठींच ....

**शुक्राचार्य :** साम्राज्याचं हितरक्षण! आपल्या हातांनीं साम्राज्याला मूठमाती कीं रे दिलीस !

**देवयानी :** बाबा, ह्या साऱ्या अनर्थाला कारण, तुमचंच दारूचं दुष्ट व्यसन ! तुमच्या व्यसनामुळंच ह्या युवराजाला कचदेवांची राख तुम्हांला दारूतून पाजविण्याची संधि मिळाली !

**शुक्राचार्य :** खरं आहे बाळ! दारूमुळंच कचाला माझ्या अंतःकरणाचा ठाव मिळाला! शत्रु पोटांत शिरला! राजा! दारूच्या भयंकर व्यसनामुळंच माझ्या अलौकिक सामर्थ्याचा आणि तुझ्या साम्राज्याचा समूळ सत्यानाश झाला रे ! जा, जा अधिराज! तुझ्या राज्यांतून दारूला कायमची हद्दपार करून टाक! दारूमुळं देहाची नासाडी होते .... मन मरून जातं .... बुद्धि भ्रष्ट होते .... दारूमुळं संपत्तीची, लौकिकाची धूळदाण उडते .... हें साऱ्या प्रजेला नीट समजावून सांग आणि ह्यापुढं जो कोणी दारू पिईल त्याला कडक शासन कर ! जा, जा अधिराज !

**वृषपर्वा :** जशी गुरुमहाराजांची आज्ञा! पण शेवटची एकच विनंती....गुरु-माऊलीनं बृहस्पतीच्या पुत्राला, आमच्या वैऱ्याला, कचाला जिवंत करूं नये.

**शुक्राचार्य :** राजा! कच माझ्या मर्मस्थानीं जाऊन बसला आहे रे! तूं नको म्हटलंस, मीं नाहीं म्हटलं, तरी कच जिवंत होणारच !

**युवराज :** पण आचार्यांनीं संजीवनी मंत्र जपलाच नाहीं तर ?

**शुक्राचार्य :** मूर्खा ! संजीवनी मंत्र मीं मुद्दाम जपण्याची जरूरच काय? माझ्या अंत:करणांत तो मंत्र सहज स्फुरण पावला तरी त्या मंत्रानं कच जिवंत होणार ....

**सेनापति :** पण कच जिवंत झाला तरी आपण त्याला संजीवनी विद्या देऊं नये ....

**शुक्राचार्य :** तुमच्या मूर्खपणाची सीमा झाली! अरे, माझ्या मर्मस्थानीं जाऊन बसलेल्या कचाला माझी इच्छा नसतांही संजीवनी विद्या आतां मिळणारच !

**युवराज :** पण संजीवनी स्फुरली तरच कच जिवंत होणार....

**वृषपर्वा :** आणि त्याला ती विद्या मिळणार! होय ना?

**सेनापति :** मग वैऱ्याला ती संजीवनी विद्या मिळण्यापेक्षां ....

**युवराज :** गुरुमाऊलींनं असंच अखेरपर्यंत दारू पीत राहून प्राणच सोडले तर .... ?

**देवयानी :** ( एकदम त्वेषानें ) कृतघ्न राक्षसांनो! हद्द झाली तुमच्या नीच-पणाची! बाबांच्या तपश्चर्येची राखरांगोळी करून वर आणखी असे त्यांच्या जिवावर उठतां? जा .... चालते व्हा आधीं दृष्टीपुढून! जा म्हणतें ना ....

[ वृषपर्वा, युवराज, वगैरे सारेजण घाबरून निघून जातात.

**देवयानी :** बाबा, कचदेव जिवंत होतील ना ?

**शुक्राचार्य :** कच जिवंत होणार ग! पण मी मात्र मरणार!

******************************************

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

**देवयानी :** पण बाबा, कच तुमचे शिष्य आहेत. गुरुभक्त आहेत. त्यांना संजीवनी विद्या मिळाली तर ते नाहीं का तुम्हांला जिवंत करणार ?

**शुक्राचार्य :** ( हताशपणें ) कच मला जिवंत करणार! हर हर! संजीवनी मंत्रानं अखिल विश्वाला जीवदान देण्याचं ज्याचं सामर्थ्य, तो हा तपोनिधि शुक्राचार्य अखेर वैऱ्याच्या पोराकडून जीवदान मिळविणार !

**देवयानी :** तसं नव्हे बाबा. गुरुदक्षिणा म्हणूनच कचदेव तुम्हांला जिवंत करतील !

**शुक्राचार्य :** असल्या दयेची दक्षिणा घेऊन लाचारपणें जिवंत राहण्यापेक्षां दारू पीत पीत मेलेलंच काय वाईट ? ( जाऊं लागतो. )

**देवयानी :** ( अडवून ) बाबा, बाबा ! माझ्यासाठीं तरी ती आग पिऊं नका .... माझ्या गळ्याची शपथ आहे तुम्हांला !

**शुक्राचार्य :** ( वैतागून ) मग मी करूं तरी काय ?

**देवयानी :** सांगितलं ना ....

**शुक्राचार्य :** ठीक आहे. बाळे, जशी तुझी इच्छा ! जशी पार्वती-परमेश्वराची इच्छा !

[ शुक्राचार्य ध्यानस्थ बसतात. कच जिवंत होऊन त्यांच्यासमोर उभा राहतो. तत्काळ शुक्राचार्य मरून पडतात.

**कच :** माझ्या पुनर्जन्मामुळं आचार्यांना मृत्यु ? मग मला संजीवनी विद्या मिळाल्याचा उपयोग काय ?

[ कच संजीवनी मंत्र जपतो. शुक्राचार्य जिवंत होतात. कच त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवितो.

**शुक्राचार्य :** कचा ! अखेर तूं मला जीवदान दिलंस ! अँ !

**कच :** गुरुमाऊलीच्या कृपेनं मला संजीवनी विद्या मिळाली ....

**शुक्राचार्य :** माझ्या कृपेनं नव्हे ! हजारों वर्षं तूं माझी सेवा केली असतीस तरीही मीं माझी संजीवनी विद्या तुला दिली नसती ! पण माझ्या दारूच्या व्यसनानं आणि दैत्यांच्या मूर्खपणानं घात केला ! म्हणून तुला संजीवनी विद्या मिळाली !


**कच :** ( प्रणाम करून ) मला आपला आशीर्वाद असावा !

**शुक्राचार्य :** जा बाळ ! तुझा अखंड विजय असो !

**कच :** ( देवयानीस ) ताई ! येतो हं !

[ कच देवलोकीं निघून जातो.

प प ड दा




# धोंडा फसला !

[ श्रीशंकराचें देवालय. सभामंडपासमोर एक वृद्ध आंधळा ब्राह्मण पुढें धोतर पसरून भीक मागत बसला आहे. प्रहर रात्रीचा सुमार झाला आहे. देवदर्शनाला येणारे भाविक स्त्री-पुरुष मूठ-पसा तांदूळ किंवा पै-पैसा त्या ब्राह्मणापुढें टाकून जातांना दिसतात.

**ब्राह्मण :** आंधळ्याला पैसा द्या हो बाप्पा ! गरिबावर दया करा हो मायबाप ! आंधळ्याला धर्म करा कुणी तरी !

[ ब्राह्मण मधून मधून वरीलप्रमाणें ओरडत असतो. इतक्यांत त्याची पत्नी येते.

**पत्नी :** हं ! पुरे आतां. चला घरीं. रात्र फार झाली.

[ ब्राह्मणापुढचें धोतर आवरते. ब्राह्मण पैसे मोजतो.

अनुक्रम ........
विभाग ........
क्रमांक
नों. दि. ........
वाचनालय शाखा

**ब्राह्मण :** अवघे सहा पैसे नि दोन पया ! म्हणजे आज कांहींच मिळालं नाहीं. तांदूळ तरी किती जमलेत ?

**पत्नी :** होतील एका वेळच्या जेवणापुरते जेमतेम !

**ब्राह्मण :** श्रीशंकराची मर्जी ! पण आज तुला उशीर झाला यायला.... म्हटलं, येतेस कीं नाहीं ? मुलाला तरी पाठवायचं होतंस ? किती रात्र झाली ही !

**पत्नी :** अहो, नेहमींप्रमाणं दिवेलागणीलाच निघालें मी इकडे यायला.

**ब्राह्मण :** मग मधेंच कुठं माशी शिंकली ?

**पत्नी :** माशी नाहीं शिंकली पण नशिबाचा नवा फेरा उगवला !

**ब्राह्मण :** नशीब तर नेहमींच हात धुवून पाठीस लागलंय् ! आज कांहीं विशेष ?

**पत्नी :** आज घरमालकानं कहर केला ! भाडं थकलंय् ना दोन महिन्यांचं ?

**ब्राह्मण :** बरं मग ?

**पत्नी :** घरांतलं सारं सामान बाहेर रस्त्यावर फेकून देऊन घराला कुलूप ठोकलं मालकानं !

**ब्राह्मण :** मालकानं ?

**पत्नी :** मालकानं म्हणजे मालकाच्या मुनीमानं ! पाऊस तर धो धो कोसळत होता .... निवाऱ्याला वीतभर जागा नाहीं .... त्यांतच कालपास्नं धाकटा तापानं फणफणलेला .... माझंच मरण ओढवलंय् चहूंकडनं ! दुसरं काय ? ( रडूं लागते. )

**ब्राह्मण :** हर हर ! प्रभो कैलासनाथा, काय रे हें ? तुला आमची दया येणार तरी कधीं ? ( पत्नीस ) बरं पुढं ?

******************************************

**********************************

**पत्नी :** पुढं काय ? शेजाऱ्यापाजाऱ्यांकडून सांगविलं, हातांपायां पडलें.... आणि आर्जवं-आळवणी करून कशीबशी आजची रात्र तेवढी राहाण्याची परवानगी मिळवली घरमालकाकडनं....

**ब्राह्मण :** एकूण त्या शेठजीला आमची थोडी तरी दया आली म्हणायची!

**पत्नी :** आज कसं तरी निभावलं. पण उद्यां ? उद्यां संध्याकाळच्या आंत बिऱ्हाड खालीं करून दिलं पाहिजे आणि त्याचं थकलेलं भाडंही पैन् पै चुकतं केलं पाहिजे....

**ब्राह्मण :** बऽऽरं ! उद्यांचं उद्यां ! आपली सारी चिंता श्रीशंकराला ! चल आतां....

[ ब्राह्मणाला त्याची पत्नी हाताला धरून घेऊन जाते. गाभाऱ्यांतून श्रीशंकर व पार्वती बाहेर येतात. सर्वत्र सामसूम असते.

**श्रीशंकर :** (ब्राह्मणाकडे पाहत हसून) बिचारा ब्राह्मण ! आधींच दरिद्री ! आणि त्यांतून आजारांत डोळे जाऊन आंधळा झालेला !

**पार्वती :** ह्या ब्राह्मणाचं दैन्य-दारिद्र्य पाहून आपणाला हसूं येतं अं ! मोठं नवल आहे बाई !

**श्रीशंकर :** किती सच्छील, समाधानी, श्रद्धाळू आहे बिचारा ! माझ्यावर ह्याची केवढी भक्ति ! खरा सत्पात्र ब्राह्मण !

**पार्वती :** पण असं असूनही त्याचं दैन्य निवारण करण्याचं आपण मनावर घेत नाहीं. देवा, ह्या जगांत सज्जनांना जर असा अखंड त्रासच भोगावा लागला तर त्यांची देवावरील श्रद्धा नष्ट नाहीं का होणार ?

**श्रीशंकर :** पार्वती, भोक्तृत्वाचे भोग आम्हां देवादिकांनाही चुकत नाहींत तिथं पामरांचा काय पाड ? जगांत निरंतर सुखी कोणी नाहीं. तसाच निरंतर दु:खीही कोणी नाहीं. सुखदु:खाचं चक्र एकसारखं फिरत असतं. पूर्वकर्मानुसार प्रत्येकाला बरे वाईट दिवस यायचेच. योग्य वेळीं ह्या ब्राह्मणाचंही दैन्य-दारिद्र्य दूर होईल. चिंता नको.

**पार्वती :** योग्य वेळ ? उद्यां त्या बिचाऱ्याचा मोडका तोडका संसार तो लोभी शेठजी रस्त्यावर आणील ! त्या ब्राह्मणाची बायकोमुलं उघड्यावर पडतील ! अन्नपाण्याविना तडफडून प्राण सोडतील ! उद्यांचं तें जितेपणींचं मरण कसं टाळावं, ह्या विवंचनेमुळं त्या नवराबायकोची आजची सारी रात्र रडण्यांत जाईल ! त्यांच्यावर चोहोंकडून आज आभाळ कोसळलंय् तरी अजून योग्य वेळ आलीच नाहीं अं ! भारीच बाई पुरुषांचं मन कठीण ! एकाद्याचं सत्त्व पाहायचं पाहायचं तरी कुठवर ? पक्का हटवादी स्वभाव ! साक्षात् रुद्रावतार ! आणि ह्यांना जग समजतंय् भोळे शंकर ! जगच बिचारं भोळं आहे झालं !

**श्रीशंकर :** पार्वती, माझ्या एकनिष्ठ भक्तांची कसोटी बघण्यांत मला मोठी मौज वाटत असते, हें खरं. पण शेवटीं, मी माझ्या भक्तांचं सर्वतोपरि कल्याण करीत नाहीं का ?

**पार्वती :** तें कांहीं नाहीं. आजच्या आज, फार तर उद्यांपर्यंत पुष्कळ संपत्ति मिळून तो ब्राह्मण सुखी झालाच पाहिजे. सांगून ठेवतें.

[ ब्राह्मणाचा घरमालक श्रीमंत शेठजी देवदर्शनाला येतो. पण गाभाऱ्याच्या बाजूनें कानांवर येणारें वरील संभाषण ऐकत एका बाजूला लपून उभा राहतो.

**श्रीशंकर :** तुला फारच दया आलेली दिसते त्या ब्राह्मणाची. स्त्रियांचं मन फारच कोमल ....

**पार्वती :** हो, आमचं मन नसतंच मुळीं पुरुषांसारखं कठोर. पण जास्त वाटाघाट नको. तो ब्राह्मण उद्यां लक्षाधीश झालाच पाहिजे.

**श्रीशंकर :** ( हसून ) अगदीं हट्टालाच पेटलीस तूं !

**पार्वती :** हो, माझा एवढा हट्ट आपण पुरविलाच पाहिजे.

**श्रीशंकर :** अग पण अशीं कामं उतावीळपणानं होत नसतात. झटपट श्रीमंती म्हणजे झटपट अधोगति ! समजलीस ? शिवाय, संपत्ति सुख देते आणि दारिद्र्य दुःख देतं, हें म्हणणंही साफ खोटं आहे.

**पार्वती :** हा नसता वेदान्त पुरे झाला. मला आधीं वचन द्यावं ....

*********************************************

*********************************************************

**श्रीशंकर :** वचन ? ठीक आहे. तो ब्राह्मण उद्यां दु:खमुक्त होईल ....

**पार्वती :** असा पोकळ आशीर्वाद नको. त्या ब्राह्मणाला उद्यांपर्यंत एक लाख रुपये मिळतील, असं नक्की आश्वासन हवं आहे मला.

**श्रीशंकर :** बरं तर, तुझी इच्छा! तुझ्यासमक्षच तशी तजवीज करतों. मग तर झालं ? ( गणपतीच्या मूर्तीस उद्देशून ) बाळ गणेश !

[ श्रीगजाननाची मूर्ति असते त्या बाजूनें पुढील शब्द येतात

**गणेश :** तातमहाराजांची काय आज्ञा आहे ?

**श्रीशंकर :** बाळ गजानना, उद्यांपर्यंत त्या आंधळ्या ब्राह्मणाला रोख एक लाख रुपये मिळतील अशी व्यवस्था कर !

**गणेश :** जशी आज्ञा !

**पार्वती :** बाळ, विसरूं नकोस हं !

**गणेश :** नाहीं विसरणार मातु:श्री !

**श्रीशंकर :** ( पार्वतीस ) झालं आतां तुझ्या मनासारखं ? चल आतां. असेच अदृश्यरूपानं आपण त्या ब्राह्मणाच्या बिऱ्हाडीं जाऊं या आणि त्याच्या अठराविश्वे दारिद्र्याची मौज पाहूं या !

**पार्वती :** दारिद्र्याची मौज बघणार ?

**श्रीशंकर :** होय. कां बरं ? अग, उद्यां तो श्रीमंत झाल्यावर पुन्हा कुठून बघायला मिळणार ती मौज ?

**पार्वती :** तेंही खरंच. पण देऊळ सोडून जायचं ? अजून दर्शनाला लोक येताहेत ! .... शिवाय, जग काय म्हणेल ?

**श्रीशंकर :** जग वेडं आहे. जगाला वाटतं, देव देवळांत असतो. पण खरं म्हणजे देव गरिबांच्या झोपडींत असतो. अनाथ-अपंगांच्या हृदयांत रमतो. श्रद्धावंत सज्जनांच्या अंत:करणांत वास करतो. देवळांत देव कधींच नसतो !

**पार्वती :** ( हसून ) देवळांत फक्त देवांच्या दगडाधातूंच्या मूर्ति असतात !

[ श्रीशंकर-पार्वती जातात. शेठजी पुढें येतो. त्याच्या मुद्रेवर आनंद-आश्चर्याच्या छटा चमकतात. थोडा वेळ विचार करीत उभा राहतो. नंतर कांहीं तरी बेत मुक्रर करून परत घरीं जाऊं लागतो. तोंच समोरून आंधळा ब्राह्मण आपल्या पत्नीसह येतांना दिसतो. त्यांना पाहून तो तसाच परत फिरतो व आड बाजूस उभा राहतो. ]

**ब्राह्मण :** (त्रासिकपणें) चल, सोड माझा हात. उगाच माझा पिच्छा पुरवूं नकोस.

**पत्नी :** पण हें काय मधेंच भूत भरलं तुमच्या डोक्यांत ? चांगले घरीं निघालेले .... पुन्हा कशाला इकडे देवळांत परत आलांत ? चला घरीं मुकाट्यानं ....

**ब्राह्मण :** एकदा सांगितलं ना ? मी घरीं येणार नाहीं. तूं जा. मी इथेंच बसणार .... ( एका खांबाला टेकून सभामंडपांत बसतो. )

**पत्नी :** थंडीनं हाडं फुटतील रात्रभर ....

**ब्राह्मण :** प्राण गेला तरी बेहेत्तर ! पण मी इथेंच देवादारीं अस्सं धरणं धरून बसणार !

**पत्नी :** इतके दिवस इथेंच धरणं धरून बसलांत कीं ! काय झालं ? आली का कांहीं दया ह्या शंकराला ? हा तर आमचा अंतच बघतोय्.

**ब्राह्मण :** खरं आहे. आजवर ह्या महादेवानं माझ्या श्रद्धेचा अंत पाहिला, पण आज मात्र मी ह्याच्या ब्रीदाचा अंत पाहणार आहें ! माझं गाऱ्हाणं मी ह्याच्यापुढं मांडणार आहें !

**पत्नी :** प्राणान्त मांडला तरी काय होणार आहे ? तुमची करुणा देवाला यायचीच असती तर ती ह्यापूर्वीच नसती का आली ? ह्या कलियुगांत देवांत देवपण उरलंय् कुठं ?

**ब्राह्मण :** आणि माणसांत तरी माणूसपण उरलंय् कुठं ?

**पत्नी :** हें भलतंच वेड टाळक्यांतनं काढून टाका नि बऱ्या बोलानं घरीं चला ....

******************************************

**ब्राह्मण :** पुन्हा तेंच. तूं जा घरीं. मी येणार नाहीं. माझा सोक्षमोक्ष आज इथेंच !

**पत्नी :** ह्या दगडी देवाच्या नांवानं अहोरात्र कंठशोष केलात तरी थोडाच पाझरणार आहे हा पाषाण? घरीं टाहो फोडून आकान्त मांडलाय् पोरांनीं आणि तुम्हांला हे खुळे चाळे सुचताहेत ! निदान चार घास तरी पोटांत कोंबा आणि मग खुशाल बसा इथें ठाण मांडून ....

**ब्राह्मण :** मला तहान-भूक कांहीं नाहीं.

**पत्नी :** पण मला आहे ना ?

**ब्राह्मण :** मग तूं जेव जा ....

**पत्नी :** तुम्ही गिळल्याखेरीज मी कशी जेवणार ? आज तुमचा सोमवार ! सकाळपास्नं पाणी तरी घातलंय् का तुम्हीं तोंडांत ? तुमच्याबरोबर आम्हांलाही उपास ....

**ब्राह्मण :** उपास तर रोजचाच आहे ....

**पत्नी :** पण मिळतंय् तेवढं तरी शिळंपाकं कदान्न खाऊन पोटाची आग शमवायला हवी ना ? चला घरीं ....

**ब्राह्मण :** शक्य नाहीं ....

**पत्नी :** आतां काय डोकं फोडून घेऊ तुमच्यापुढं ? अहो, माझी नको पण त्या पोरांची तरी कींव येऊं दे तुम्हांला ....

[ शेठजी पुढें येतो.

**शेठजी :** ( ब्राह्मणास ) अहो भटजीबुवा, काय मांडलाय् हा प्रकार ? मध्यरात्र होत आली .... चला घरीं ....

**ब्राह्मण :** घर ? कुठलं घर ? आतां इथंच देवादारींच आमचं घरदार ! आमचा सारा संसार !

**शेठजी :** भटजीबुवा, आपण प्रापंचिक माणसं. असं घरादाराला वैतागून, बायकोपोरांना कंटाळून कसं चालेल ?

**पत्नी :** सांगा सांगा, तुम्ही तरी कांहीं शहाणपणाच्या चार गोष्टी सांगा ह्यांना .... टाळकं फिरलंय् ह्यांचं ....

**ब्राह्मण :** नशीबच फिरल्यावर टाळकं कां फिरणार नाहीं ?

**शेठजी :** पण असं संकट तरी कोणतं कोसळलंय् तुमच्यावर ?

**पत्नी :** शेठजी ! तुम्हीच विचारतां का हें ? बरेच मानभावी, संभावित आहांत कीं ! अहो, तुमच्या पायींच तर हा सगळा अनर्थ ओढवलाय् !

**शेठजी :** माझ्यापायीं अनर्थ ? मीं काय तुमचं घोडं मारलं बुवा ?

**ब्राह्मण-पत्नी :** 'उद्यां संध्याकाळच्या आंत घर सोडा आणि मागलं भाडं एका रकमेनं चुकतं करा'– असं तुमचाच मुनीम बजावून गेला ना ? तुम्हीच त्याला तगाद्याला धाडलात ना ?

**शेठजी :** छे छे ! मला ह्यांतलं कांहींच माहीत नाहीं.

**पत्नी :** वा ! शेठजी ! करून सवरून नामानिराळे ! तुम्हीच आमच्यावर दुष्टपणानं असा प्रसंग आणलात आणि हा असा उलटा कांगावा करतां काय ? बरेच वस्ताद दिसतां कीं ! लबाड ! ढोंगी !

**ब्राह्मण :** हो. हो. पण किती तोंड करतेस ? जाऊं दे ना ? देवानंच शेठजींना तशी बुद्धि दिली. आपल्या कर्माचा दोष ! त्यांचा काय दोष ?

**शेठजी :** असं कां बरं बोलतां ? नोकराच्या गाढवपणाबद्दल मला कां दोष देतां ? मी स्पष्ट सांगतों तुम्हांला, तुम्ही भाडं मुळींच देऊं नका.

**ब्राह्मण :** असं कसं होईल ? तुमचं भाडं थकलं आहे ....

**शेठजी :** थकलं तर थकलं. पण त्यावांचून माझी चूल का अडून राहिलीय् ?

**ब्राह्मण :** दुसऱ्याचं देणं वेळेवर दिलं पाहिजे माणसानं. बाकी एकदा थकत चालली कीं फार फुगत जाते. सारं कळतंय् मला. पण काय करूं मी ? नशीबानं नाडलोंय् हो !

**शेठजी :** भटजीबुवा, नका वाईट वाटून घेऊं. तुम्ही खुशाल आनंदानं जन्मभर माझ्या घरांत राहा. एक पैसुद्धा भाडं मला देऊं नका. मागलं तर

*****************************************

*****************************************

नकोच, पण पुढंही नको. तुमच्यासारखा सज्जन, सात्त्विक, कुटुंबवत्सल ....

**पत्नी :** शेठजी, साखर तर खूपच पेरतां कीं हो! हीं असलीं गोड गोड वरकरणी बोलणीं आणि आंतून मात्र कसाबाची करणी!

**शेठजी :** शिव शिव! बाई, काय बोलतां हें? मी अगदीं मनापासून कळवळून सांगतोंय् तुम्हांला .... अहो, पैसा मिळून जातो, पण माणसं, तुमच्यासारखीं देवमाणसं, मिळत नसतात! काय सांगूं? तुमची ही दैन्यावस्था बघून माझं काळीज कसं तिळतिळ तुटतंय् हो! ( सुस्कारा टाकून उपरण्यानें उगीचच डोळे पुसतो. ) भटजीबुवा! ईश्वरसाक्ष सांगतों .... तुमच्या-साठीं कांहीं तरी करावंसं वाटूं लागलंय् मला ....

**ब्राह्मण :** शेठजी, काय करणार तुम्ही आमच्यासाठीं? फाटलेल्या आभाळाला किती कुठवर ठिगळं लावणार? तुम्ही आम्हांला थकलेल्या घरभाड्याची सूट दिलीत आणि पुढंही फुकट राहायची परवानगी दिलीत, हेच तुमचे आमच्यावर डोंगराएवढे उपकार झालेत!

**शेठजी :** हे कसले उपकार? तुम्हांला कांहीं तरी मोठी मिळकत करून द्यावी आणि हें तुमचं जन्माचं दारिद्र्य दूर करावं, असं माझ्या मनांत आलं आहे.

**ब्राह्मण :** तुमच्या मनांत येऊन काय उपयोग?

**पत्नी :** आमच्या नशिबांत हवं ना?

**शेठजी :** भटजीबुवा, तुम्ही आम्ही मिळून एक सौदा करूं या....

**ब्राह्मण :** सौदा? तो कसला?

**शेठजी :** कसा झालों तरी मी आहें व्यापारी बच्चा! सट्टा, जुगार खेळल्या-खेरीज लक्ष्मी पायांशीं लोळायची नाहीं, हा आपला आमचा अनुभवाचा अडाखा! तेव्हां म्हणतों, सट्टयाचा सौदा करूं या.

**ब्राह्मण :** अहो, दैवाचा सट्टा-जुगार जन्मभर खेळतोंयच कीं मी!

**पत्नी :** पण ह्या जन्मीं तरी आतां मनासारखं दान पडण्याचं चिन्हच नाहीं...

**ब्राह्मण :** पण त्याबद्दल माझी तक्रारही नाहीं. उदरनिर्वाहापुरतं मिळालं तरी पुष्कळ झालं.

**पत्नी :** तुमचं पुरे ! शेठजी, सांगा हो तुमची सौद्याची कल्पना ....

**शेठजी :** भटजीबुवा, तुम्हांला आजपर्यंत जास्तींत जास्त प्राप्ति किती झाली आहे ?

**ब्राह्मण :** एकदा महाशिवरात्रीला अडीच रुपयांचा खुर्दा मिळाला होता. आणि परवां यात्रेच्या दिवशीं पावणेदोन रुपये मिळाले होते.

**शेठजी :** समजलं. म्हणजे नशीब फारच फळफळलं तर सरासरीनं एक रुपया मिळतो म्हणायचा तुम्हांला ....

**पत्नी :** अहो, इतकं तरी कुठलं ? पण तुम्ही कसला सौदा करणार ? सांगा ना ? ...

**शेठजी :** तुमच्या उद्यांच्या मिळकतीवर मी सट्टा करतों...

**ब्राह्मण :** पण उद्यां काय आहे ? उद्यां कसला सण नाहीं, उत्सव नाहीं, यात्रा नाहीं, कांहीं नाहीं. आज तेंच उद्यां !

**शेठजी :** असूं दे. पण मी करतों सौदा ! आज रोख दहा रुपये मी तुम्हांला देतों.

**पत्नी :** आणि मग ?

**शेठजी :** उद्यां सकाळपासून मध्यरात्रीपर्यंत जें कांहीं तुम्हांला मिळेल, तें सारं जसंच्या तसं बिनतक्रार तुम्ही माझ्या स्वाधीन केलं पाहिजे. आहे कबूल ?

**पत्नी :** कबूल आहे. काढा दहा रुपये.

**ब्राह्मण :** शेटजी, थांबा. तुमचे दहा रुपये मला नकोत. तुम्हांला मला कांहीं धर्मच करायचा असेल तर समाधानानं मला कांहीं हात उचलून द्या. मी तें आनंदानं घेईन. पण असला भलताच करार करून तुमचं नुकसान व्हावं अशी माझी इच्छा नाहीं.

*************************************************

***************************************************

**शेठजी :** माझ्या नफानुकसानीची फिकीर तुम्ही करूं नका. मीही ती करीत नाहीं. मी हें सारं केवळ तुमच्या फायद्यासाठीं करतों आहें ! गेले माझे दहा रुपये तर जाऊं देत. मी कांहीं तेवढ्यानं गरीब होत नाहीं.

**ब्राह्मण :** आणि तुमच्या दहा रुपयांनीं मीही कांहीं कायमचा श्रीमंत होत नाहीं. मग थोडक्यासाठीं एक दिवसाचं तरी माझं नशीब मी तुम्हांला कां म्हणून विकावं ? शिवाय, तसं करणं म्हणजे एक प्रकारें देवावरच अविश्वास दाखविल्यासारखं नाहीं का होणार ?

**पत्नी :** कुठला देव नि कसला त्याचा विश्वास धरायचा ? शेठजी, मला पसंत आहे तुमचा सौदा. द्या दहा रुपये.

**ब्राह्मण :** खुळी आहेस तूं. अग बायको, दहा रुपड्यांसाठीं का आपण आपलं सत्त्व सोडायचं ? श्रीशंकरावर माझी पूर्ण श्रद्धा आहे. त्याला माझी दया आली तर दहाच काय, तो मला दहा हजारसुद्धा देईल !

**पत्नी :** हो ! दहा हजार रुपये देतोय् ! दहा कवड्या दिखील देणार नाहीं तो तुमचा शंकर. द्यायचे असते त्याला तर एव्हांना नसते का दिले ?

**शेठजी :** शंकरानं दिले नाहींत तरी, मी देतों दहा हजार ! 'दहा हजार म्हणतां तर दहा हजार ! पण बैठक मोडायची नाहीं. बसल्या बैठकीला सौदा ठरला पाहिजे. घ्या दहा हजार !

**पत्नी :** काय म्हणतां ? खरंच ? कीं आमची आपली चेष्टा करतांय् ?

**शेठजी :** चेष्टा नव्हे. खरंच तुम्हांला दहा हजार आत्तां देतों. भटजीबुवा ! तुम्ही फक्त ठरलं म्हणा !

**पत्नी :** [ ब्राह्मणास ] अहो, ठरलं म्हणा ! शुंभासारखे स्वस्थ काय बसलांत ? होय म्हणा .... ठरलं म्हणा .... ( शेठजीस ) मी सांगतें, ठरलं !

**ब्राह्मण :** काय ठरलं ? तुझं कपाळ ? कांहीं नाहीं ठरलं. शेठजी, नका माझा असा अंत पाहूं. तुम्ही दहा हजार दिलेत तरी मी तुम्हांला माझं नशीब विकणार नाहीं. पुन्हा सांगतो.

**शेठजी :** नशीब तुमचं !

**पत्नी :** ( कपाळावर हात मारून ) दैव देतं नि कर्म नेतं ! दुसरं काय ? अहो, कां आठवली ही अवदसा तुम्हांला ? आयते दहा हजार मिळताहेत .... लक्ष्मी आपण होऊन घरीं चालून येते आहे ! तिला तुम्ही लाथाडतां ?

**शेठजी :** भटजीबुवा, असा अविचारानं त्रागा मांडण्यांत काय अर्थ आहे ? तुम्ही स्वतः निरिच्छ असाल, तुम्हांला पैशाची जरूर वाटत नसेल, पण तुमच्यावर चार मुलं-माणसं अवलंबून आहेत. सोन्यासारखीं चार पोरंबाळं, सीता-सावित्रीसारखी सद्गुणी पत्नी .... त्यांची तरी जबाबदारी ओळखा. तुम्हीच असा आत्मघातकीपणा आरंभलात तर त्यांनीं कोणाच्या तोंडाकडे पाहावं बरं ? दहा हजार राहूं देत. त्याच्या दुप्पट वीस हजार देतों ! देऊं वीस हजार ?

**ब्राह्मण :** नको !

**शेठजी :** चाळीस हजार ?

**ब्राह्मण :** ऊं हूं !

**शेठजी :** पन्नास हजार ?

**ब्राह्मण :** नको ! नको !! नको !!!

**शेठजी :** शेवटचा सवाल ! पाऊण लाख ?

**पत्नी :** काय ? पाऊण लाख ?

**शेठजी :** होय ! पंच्याहत्तर हजार !

**पत्नी :** अहाहा ! देवच पावला !

**शेठजी :** पण ही बैठक मोडली तर उद्यां पाव आणा देखील मिळणार नाहीं. विचार करा.

**ब्राह्मण :** मीं पूर्ण विचार केला आहे. कां माझ्या नशिबाचा तुम्ही असा लिलांव मांडतांय् ? पाऊण लाखासाठींसुद्धा मी माझं सत्त्व मुळींच सोडणार नाहीं !

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ३६५८ नों. दि ...
वि. वा.वा. ...

***************************************

***************************************************

**पत्नी :** ( एकदम उसळून ) बाई बाई बाई ! हद्द झाली तुमच्या हटवादी-पणापुढं ! मग आतां मला नि पोरांना बाजारांत नेऊन विका ! नाहीं तर विष घालून मारून तरी टाका ! देवा, देवा ! काय रे मांडलास हा माझा छळवाद ! कोठून हा कर्मदरिद्री धोंडा माझ्या गळ्यांत बांधलास !

( रडूं लागते. )

**शेठजी :** बाई, तुम्हीच पाहा म्हणजे झालं. पाऊण लाख ! एवढी अफाट संपत्ति सात जन्मांत तरी तुमच्या नवरोजींना कमावतां येईल का ?

**ब्राह्मण :** अहो शेठजी ! काय सांगतां तुम्ही तुमच्या पाऊण लाखाची प्रतिष्ठा ? माझा भोळा शंकर प्रसन्न होईल तर तो मला कुबेराचं भांडार देईल ! माणूस माणसाला देऊन देऊन किती देणार ? खरा दाता तो परमेश्वर .... श्रीशंकर !

**पत्नी :** ( निश्चयी स्वरांत ) शेठजी, ह्यांचं फिरलंय् टाळकं ! तुम्ही ह्यांचं ऐकूं नका. हे एक माणसांतून, संसारांतून उठलेत, पण मला मुलाबाळांची काळजी घेतली पाहिजे. मी तुमचा सौदा कबूल करतें. आत्तांच्या आत्तां पाऊण लाखाची रोख रक्कम आमच्या पदरांत टाका आणि उद्यां धोतरावर येईल तें सगळं तुम्ही घ्या ! उठा, आणा पाऊण लाख !

**शेठजी :** उद्यां सकाळचा वायदा ! आत्तांचा नाहीं.

**पत्नी :** तो कां ? उद्यांचा वायदा कां ? आत्तांचा, ह्या घडीचा कां नाहीं ?

**शेठजी :** साफ साफ बोलतों. माफ करा. पण त्याचं असं कीं .... भटजीबुवांचं रात्रींतच कांहीं बरं वाईट झालं तर .... मला निष्कारण पाऊण लाखाची खोट !

**पत्नी :** ( एकदम त्वेषानें ) शेठजी, शुद्धीवर आहांत का तुम्ही ? लाज नाहीं वाटत तुम्हांला असलं भलतं सलतं अभद्र, ओंगळ बोलायला ?

**शेठजी :** हें पाहा बाई, रागावूं नका. मी आहें व्यापारी माणूस. सर्व बाजूंनीं विचार केल्याखेरीज असली भयंकर जोखमीची उडी ....

**पत्नी :** कळली तुमची धडाडी! एकदा सौदा ठरला म्हणतां नि आतां वांधा घालतां? हीच का तुमची दानत? बोल बोल म्हणतां बोल फिरवतां? चला, चालते व्हा इथून. आग लावा तुमच्या त्या पाऊण लाखाला! वरनं परोपकाराचा आव आणि मनांतनं ओंगळ आवाडाव?

**शेठजी :** गैरसमज करून घेऊं नका. माझं मन निर्मळ आहे. शब्द दिला तो दिला. रीतीचं बोलणं तुम्हांला रुचलं नाहीं. ठीक आहे. तुम्हांला आत्तां हवेत का पाऊण लाख? थांबा इथेंच. श्रीशंकर-पार्वतीला साक्षी ठेवून ह्या गणरायासमोर पाऊण लाखाची रोख रक्कम मी आत्तां आणून देतों तुम्हांला. मग तर झालं? अहो, पाऊण लाख म्हणजे माझ्या तिजोरींतला कचरा आहे कचरा! ( जातो. )

**पत्नी :** ( आनंदानें ब्राह्मणास गदागदा हालवीत ) अहो! शेठजी पैसे आणायला गेले!

**ब्राह्मण :** मूर्ख आहेस तूं! शेठजींनीं आपली गरिबांची थट्टा केली नि तुला ती खरी वाटली. मुलुखाची हांवरी तूं!

**पत्नी :** आणि खरंच त्यांनीं पैसे आणले तर?

**ब्राह्मण :** महा लोभी व्यापारी माणूस तो! पाप कुणाला द्यायचा नाहीं. तो पैसे देतोय् होय? चामडी देईल पण दमडी देणार नाहीं तो. म्हणे पाऊण लाख देतोय्! लुच्चा लेकाचा!

**पत्नी :** नसती वटवट नको आतां. त्यानं पैसे आणले म्हणजे ....

**ब्राह्मण :** त्यानं आणले तरी ते मी घेणार नाहीं. माझं सत्त्व .... माझं तत्त्व ....

**पत्नी :** पुन्हा आली तुमची कथा मूळपदावर! अहो, देवाला जर तुमचं सत्त्व राखायचंच असेल तर तो तुम्हांला उद्यां पाऊण लाख मिळवून देईल कीं! आणि ते सारे त्या शेठजीला मिळतील. मग तर त्याच्या ऋणांत आपण राहणार नाहीं ना? तुमचं नव्हे पण .... खरं म्हणजे आतां देवानंच आपलं स्वतःचं सत्त्व राखलं पाहिजे. भक्ताची लाज भगवंतालाच!

**************************************************

*******************************************

**ब्राह्मण :** तेंही खरंच आहे.

**पत्नी :** तुमची देवावर पूर्ण श्रद्धा आहे ना ? देवानंच शेठजींच्या मनीं-मुखीं उभं राहून हा सौदा ठरवला नसेल कशावरून ?

**ब्राह्मण :** असेल, तसंही असेल.

[ इतक्यांत रुपयांच्या थैल्या घेतलेल्या दोन इसमांसह शेठजी येतो.

**शेठजी :** भटजीबुवा, ही घ्या पंच्याहत्तर हजारांची रोख रक्कम !

**पत्नी :** ( आनंदानें बेहोष होऊन ) खरंच ? रुपये भरलेत ह्या थैल्यांत ? आमचे हे सगळे पैसे ? पाऊण लाख रुपये ?

**शेठजी :** थैल्या तुमच्या हातांनीं सोडा ... रक्कम मोजून घ्या ... छन्छन् वाजवून घ्या ...

[ ब्राह्मणाची पत्नी आनंदानें त्या थैल्या उराशीं कवटाळते व मोठ्यांदा हसत राहते.

**ब्राह्मण :** शेठजी, आम्ही हे रुपये मोजीत, वाजवीत बसत नाहीं. ते वीस हजार असोत कीं पाऊण लाख असोत ! खरे असोत कीं खोटे असोत ! तुम्ही खरोखर कर्णाचे अवतार आहांत, ह्यांत शंका नाहीं.

**शेठजी :** माझं काम मीं केलं.

**ब्राह्मण :** आतां माझं कर्तव्य मला केलं पाहिजे. शेठजी, उद्यांचा एकच दिवस काय, पण उद्यांपासून सतत एक वर्षभर मी भीक मागत बसतों. जें कांहीं मला मिळेल तें सारं तुम्हांला देतों ...

**शेठजी :** वर्षभर नकोच. फक्त उद्यांचा एकच दिवस ...

**ब्राह्मण :** जशी तुमची इच्छा !

**शेठजी :** पण हा आपला करार नक्की ठरला ना ?

**ब्राह्मण :** श्रीशंकराच्याच साक्षीनं नक्की ठरला ! शिव हरा ! शंकरा ! शेठजींचा सौदा यशस्वी कर, हीच तुला प्रार्थना !

[ ब्राह्मण शंकराच्या पिंडीपुढें हात जोडतो. त्याची पत्नी भराभर थैल्या सोडून रुपये मोजूं लागते. शेठजी त्या उभयतांकडे विजयी मुद्रेनें पाहत गालांतल्या गालांत हसत उभा राहतो. हळुहळू पडदा पडतो.

# २

[ दुसऱ्या दिवशीं मध्यरात्रींचा सुमार. देवळांत ब्राह्मण भीक मागत बसला असून शेठजींचा मुनीम समोरच एका खांबाला टेकून पेंगत बसला आहे. ब्राह्मणाचीं मुलें व पत्नी उंची वस्त्रालंकारांनीं नटून थटून येतात.

**पत्नी :** ( ब्राह्मणास ) अहो, अजून काय बसलांत इथें ? उठा आतां. चला. मध्यान्ह होत आली ....

**मुलगा :** बाबा, बाबा, माझा नवा पोषाख तरी पाहा. रेशमी कपडे, जरीची टोपी, कानांत भिकबाळी, हातांत आंगठ्या ....

**ब्राह्मण :** अरे वा ! राजपुत्रासारखाच सजला आहेस वाटतं ?

**मुलगी :** हो .... आणि बाबा, मी किनई राजकन्येप्रमाणं नटलें आहें. आणि आई तर काय ! कोणी म्हणेल, राजाची राणीच !

**मुलगा :** पण बाबा, तुम्ही कां हो अजून भीक मागतां ?

**ब्राह्मण :** बाळ, आजचाच दिवस .... उद्यांपासून नाहीं मी भीक मागणार !

**पत्नी :** मागाल, उद्यांसुद्धा तुम्ही भीक मागाल ! जन्मगुण थोडाच टळतोय् ! भिकेचे डोहाळे आयुष्यभर आठवायचेच तुम्हांला. चला म्हटलं, तर अजून हालत नाहीं तुम्ही जागचे.

**ब्राह्मण :** अग, कराराप्रमाणं मध्यरात्र उलटून जाईपर्यंत बसलं पाहिजे मला. शेठजी काय म्हणतील ?

**पत्नी :** शेठजी काय म्हणणार डोंबलं ? सौदा अंगलट आलाय् त्यांच्या. आतां शिमगा मात्र करतील भरपूर.

*********************************************

**********************************************

**ब्राह्मण :** त्यांचं नशीब त्यांच्याबरोबर. आम्हीं आमच्याकडून करार पुरा केला आहे. हो .... तेवढंच आमच्या मनाला समाधान. तूं घरीं जा मुलांना घेऊन. त्यांना झोपवून जराशानं मला घरीं घेऊन जायला ये.

**पत्नी :** मी परत येऊं म्हणतां तुम्हांला घेऊन जायला ?

**ब्राह्मण :** हो. कां ?

**पत्नी :** इश्श ! मला बाई आतां लाज वाटते.

**ब्राह्मण :** लाज वाटते ? ती ग कां ?

**पत्नी :** अहो, मी अशी ऐश्वर्यानं सजलेली ! आणि तुम्ही तर भणंग भिकाऱ्याच्या वेषांत ! रस्त्यानं मी तुम्हांला हाताला धरून नेऊं लागलें तर लोक मला हसतील ना ? मी नोकरालाच धाडून देतें.

**ब्राह्मण :** अस्सं ! म्हणजे श्रीमंती येऊन पुरता एक दिवसही झाला नाहीं .... तोंच बरीच शेफारलीस कीं तूं. पैसा दुर्गुणांचा पोशिंदा, असं म्हणतात तेंच खरं .... तें कांहीं नाहीं, तुला बजावून ठेवतों, तूंच आलं पाहिजेस. नोकर पाठवूं नकोस. नाहींतर सांगतों शेठजींना, कीं बाबा रे, आपले पाऊण लाख परत घेऊन जा....

**पत्नी :** तें कां ? त्यांचा करार तर पुरा केला आपण ....

**ब्राह्मण :** पण तें द्रव्याचं विष घरांत येतांक्षणींच तुझी बुद्धि बदलली. तुला गर्व चढला. तुझा मीपणा वाढला. लक्ष्मी घरीं शिरली आणि गृहलक्ष्मी बिथरली !

**पत्नी :** तर तर ! एवढं कांहीं रागवायला नको हो ! माझं मन पूर्वींप्रमाणंच प्रेमळ, निर्मळ आहे. मीच येतें बरं पुन्हा. चला रे मुलांनो !

[ मुलांना घेऊन जाते. तोंच खिन्न मुद्रेनें शेठजी येतो.

**शेठजी :** ( मुनीमास ) काय मुनीमजी ! सारखी टेहेळणी ठेवली होतीत ना ? हाललां नाहींत ना जागचे ?

**मुनीम :** छे-छे ! डोळ्यांत तेल घालून त्या ब्राह्मणाच्या पुढं पसरलेल्या फडक्यावर नजर ठेवलीय्. पण शेठजी, नजर ठेवायला आहे काय त्या

फडक्यावर ? थोडींशीं सडकीं, किडकीं फळं आणि ओंजळभर तांदूळ....

**शेठजी :** ( आश्चर्यानें ) म्हणजे ? पैसे नाहींत ?

**मुनीम :** पाहतों जवळ जाऊन.

[ मुनीम चोरपावलीं जाऊन फडक्यावर पैसे पाहतो.

**शेठजी :** किती आहेत पैसे ?

**मुनीम :** पैसे नाहींतच. फक्त दोन पया आहेत. त्यांतली एक खोटी आहे आणि दुसरी झिजून गुळगुळीत झालेली आहे. दांतावर मारायला देखील दिडकी नाहीं.

**शेठजी :** चांगलेच दांत पडले म्हणायचे माझे !

**ब्राह्मण :** शेठजी, आलांत वाटतं ? आम्ही घरीं जातों आतां. काय जमलं असेल फडक्यावर तें सगळं घ्या. काय काय मिळालंय् सांगा बरं.

**शेठजी :** (संतापून) मिळालींत तुझीं हाडं ! तुझ्या नशिबाशीं मीं माझं नशीब घासलं आणि फुकट आपल्या हातांनीं सत्यनाश करून घेतला ! जन्मदरिद्री कर्मचांडाळ तूं....

**ब्राह्मण :** (शांतपणानें) शेठजी, आतां माझ्यावर कां रागावतां ? तुम्ही ह्या भलत्या फंदांत पडूं नका, असं मीं प्रथमच नव्हतं का बजावलं तुम्हांला ? तुम्हीच हा सट्टा अट्टाहासानं माझ्या गळ्यांत बांधलात !

**शेठजी :** पण आतां मला गळफास लावून घेण्याची पाळी आली आहे ना ?

**ब्राह्मण :** श्रीगजाननाच्या साक्षीनंच सारा करारमदार झाला आहे....

**शेठजी :** म्हणूनच विचारतों ना गजाननाला ........

**ब्राह्मण :** (खिन्नपणानें हसून) तुम्ही काय विचारणार त्याला ? तो काय सांगणार ?

**शेठजी :** मी काय विचारणार आणि तो काय सांगणार, हें त्या गजाननाला ठाऊक कीं मला ठाऊक ! देव झाला म्हणून काय झालं ? गजाननाच्या बापाला सोडीत नाहीं पैसे !

**************************************

*******************************************

**ब्राह्मण :** तुम्ही काय बडबडतांय्, कांहींच कळत नाहीं मला.

**शेठजी :** नाहींच कळणार तें. तूं जरा तिकडे बाहेर जा ....

[ ब्राह्मण जातो. शेठजी गणपतीच्या मूर्तीजवळ जातो.

**शेठजी :** गणपते ! ह्या आंधळ्या ब्राह्मणाला एक लाख रुपये देण्याबद्दल तुला शंकराची आज्ञा झाली होती कीं नाहीं ? खरं बोल. मीं स्वतः ह्या माझ्या कानांनीं सगळं संभाषण ऐकलंय् ....

[ गणेशमूर्तीच्या बाजूनें आवाज येतो.

**गणपति :** बरं मग ?

**शेठजी :** मध्यरात्र उलटून गेली तरी अजून त्या ब्राह्मणाला कांहींच मिळालं नाहीं, हें कसं ?

**गणपति :** पण ही नसती चौकशी तुला कशाला ? तुझं काय नफा-नुकसान अवलंबून आहे त्याच्या लाख रुपयांवर ? तुला पंचाईत करण्याचं कारण ?

**शेठजी :** (गोंधळून) कारण ? कारण कांहींच नाहीं तसं. पण गरीब बिचारा ब्राह्मण ! कुणाचंही बरं व्हावं हीच माझी इच्छा.

**गणपति :** बराच पान्हा फुटलाय् कीं तुला ब्राह्मणाचा. पण कालच त्याचीं भांडींकुंडीं रस्त्यावर फेकून देणारा तूं ! आणि आजच कां रे बाबा त्याचा एवढा पुळका आलाय् तुला ?

**शेठजी :** गणराया, माझं दयाळू अंतःकरण तूं जाणतोसच ........

**गणपति :** तुझं अंतःकरण पूर्ण ओळखून आहें मी.

**शेठजी :** मग असं कां बरं बोलतोस देवा ? शिवाय, बोलला बोल खोटा पडला तर देवाच्या ब्रीदाला बोल नाहीं का लागणार ? आणि मग माझ्या-सारख्या एकनिष्ठ भक्ताला तें कसं बरं बघवेल ? म्हणून अगदीं काकुळतीनं प्रार्थना करतों. .... गणराजा ! ....

[ बोलतां बोलतां सहज गणपतीच्या सोंडेला शेठजी स्पर्श करतो. तत्काळ गणपति शेठजींचे दोन्ही हात सोंडेच्या विळख्यानें घट्ट धरून ठेवतो. दगडी सोंड सजीव झालेली पाहून शेठजी भयचकित होऊन ओरडतो.

**गणपति :** काय म्हणतोस रे लबाडा ? तुझा डाव मीं ओळखला नाहीं असं तुला वाटलं होय ?

**शेठजी :** क्षमा कर, मोरया बाप्पा ! क्षमा कर !

**गणपति :** एक लाख त्या ब्राह्मणाला मिळणार म्हणतांना तूं आधींच त्याला पाऊण लाख दिलेस ! तेवढाच पंचवीस हजार रुपये नफा एका दिवसांत ! असंच ना ?

**शेठजी :** होय .... ओय् – ओय् – ओय् !

**गणपति :** चूप ! ओरडूं नकोस. नाहीं तर वाचा कायमची बंद होईल !

[ शेठजी गप्प राहतो. गाभाऱ्यांतून श्रीशंकरांचे गंभीर शब्द ऐकूं येतात.

**श्रीशंकर :** बाळ गजानन ! त्या ब्राह्मणाला एक लाख रुपये पोहोंचते केलेस ?

**गणपति :** तातमहाराज, पाऊण लाखाची व्यवस्था कालच आपली आज्ञा होतांच केली ! बाकीच्या रकमेसाठीं हात धरून ठेवले आहेत ! ( सोंडेनें हात आवळतो. शेठजी ओरडतो. )

**शेठजी :** ओयोयो ! मेलों ! मेलों ! देवा गजानना, सोड, सोड माझे हात !

**गणपति :** महामूर्खा ! पार्वती-परमेश्वरांचं संभाषण चोरून ऐकून त्या भोळ्या सत्त्वशील ब्राह्मणाशीं सट्टयाचा सौदा केलास काय ? देवांच्या भाषणाचेसुद्धा टक्के करायला पाहातोस ? भोग आपल्या लोभाचीं, वासनेचीं फळं !

**शेठजी :** पण गणपते ! हें सगळं त्रांगडं असं माझ्याच गळ्याशीं येईल, हें काय बरं मला माहीत ?

**गणपति :** बाबा रे ! देव कोणाला कधींही स्वतःचं कांहीं काढून देत नसतो. त्याचप्रमाणं तो कोणाचं कांहीं लुबाडूनही घेत नसतो ! दुर्जनाचें घ्यावें नि सज्जनाला द्यावें, हा आहे देवांचा सनातनी संप्रदाय ! .... मुनीमाला पाठवून उरलेले पंचवीस हजार रुपये आत्तांच्या आत्तां त्या ब्राह्मणाच्या स्वाधीन कर.

*****************************************

************************************************

**शेठजी :** करतों ! ... पण हात सोड रे देवा !

**गणपति :** रक्कम पटली कीं हात सुटतील. सांग मुनीमाला.

**शेठजी :** सांगतों. मुनीमजी, तावडतोब घरीं जा आणि पंचवीस हजार रुपये आणून त्या ब्राह्मणाला द्या.

**मुनीम :** जशी आज्ञा.

**शेठजी :** धावत जाऊन पळत या. इकडे माझ्या प्राणांवर बेतलंय् !

[ मुनीम घाईघाईनें जातो.

**शेठजी :** विघ्नहर्त्या गजानना ! ह्या प्राणसंकटांतून वांचीव मला. हे लंबोदरा, मी तुला गूळखोबरं देईन ! सव्वा मणाचे मोदक देईन ! तुला एकवीस दुर्वा वाहीन ! फार काय, पण दरसाल दहा दिवस तुझा मोठा उत्सव साजरा करीन रे !

**गणपति :** संपले सारे तुझे नवस ? असल्या नवसाला पावणारा .... म्हणजेच लांचलुचपत खाणारा हा गणपति नव्हे. समजलास ? वेड्या, देव भक्तीनं प्रसन्न होतो. नवसानं नव्हे ! बोलाव त्या ब्राह्मणाला इकडे ....

**शेठजी :** कशाला ? ही माझी शोभा पाहायला कीं काय ?

**गणपति :** माझ्या देखत रकमेची रुजुवात होऊं दे ....

**शेठजी :** ठीक आहे. अहो भटजीमहाराज, जरा इकडे या.

[ ब्राह्मण चांचपडत ठेचाळत येतो.

**ब्राह्मण :** हा आलों. काय म्हणतां शेठजी ?

**शेठजी :** काल मीं किती रक्कम दिली तुम्हांला ?

**ब्राह्मण :** पाऊण लाख !

**शेठजी :** आतां आणखी पंचवीस हजार दिले म्हणजे किती होतील ?

**ब्राह्मण :** बरोबर एक लाख रुपये !

[ इतक्यांत ब्राह्मणाची पत्नी मुनीमासह येते.

**पत्नी :** लाख रुपये ! मिळाले लाख रुपये ! हे पाहा, पंचवीस हजार आत्तांच त्यांनीं दिले ! काल पाऊण लाख ! आत्तां पाव लाख ! पाहा - पाहा .... आपलं थोर वैभव !

**ब्राह्मण :** पण मला आंधळ्याला तें कसं दिसणार ?

**गणपति :** भटजीबुवा, डोळे उघडा ! ( शेठजीचे हात सोडून भटजीच्या डोळ्यांना सोंडेचा स्पर्श करतो. भटजीला दिसूं लागतें. )

**ब्राह्मण :** हा काय चमत्कार ! मला दृष्टि आली ! दिसूं लागलं !

**पत्नी :** अगबाई ! खरंच कीं ! तुम्ही अगदीं चक्क डोळे उघडलेत !

**शेठजी :** माझेसुद्धा आज पुरते डोळे उघडले !

**ब्राह्मण :** हा सारा श्रीशंकराचा कृपाप्रसाद ! !

( सर्वजण भक्तिभावानें श्रीशंकराची पुढीलप्रमाणें प्रार्थना करतात —

**दाविसि लीला नवल नटवरा !**
**भुलविसि अवघें विश्व शिव हरा !**

**काल महेश्वर तूं प्रलयंकर**
**परि भवभयहर सुजन-शुभंकर**
**सांब सदाशिव भोळा शंकर**
**तारक परमेश्वर चराचरा !**

**चरणां शरणागत दीनांवर**
**करुणाकर ! करुणा कर सत्वर**
**पाप-तापहर देई अभय-वर**
**तुजविण दुसरा जगिं न आसरा !**

प ड दा

**************************************



# अढळपद

**स्थळ :** मधुवन, यमुना-तीर. एका वटवृक्षाखालीं ध्रुवबाळ डोळे मिटून ध्यान लावून बसला आहे. नारदमुनि प्रवेश करतात.

**नारद :** देवा नारायणा ! ह्या अजाण बालकाचीं करुणा तुम्हांला येणार तरी केव्हां ? ह्या बालभक्ताचा अंत तुम्ही पाहाणार तरी कुठवर ?

**देवा ! कुठें गुंतलां ?**
**कशि नाहीं लवहि करुणा दयाळा ?**
**सत्याग्रही बाळ हा**
**तपोनिधीच महा**
**ध्रुवबाळासि दर्शन द्या ह्या काला**

[ श्रीविष्णु प्रकट होतात.

अहाहा ! अवघ्या विश्वांतलं प्रेम आणि सामर्थ्य देहरूपानं ह्या ठिकाणीं येऊन उभं राहिलं आहे ! ( नमस्कार करून ) देवा ! ह्या बालकावर आपण प्रसन्न केव्हां होणार ?

नों. दि. वाचनालय शाखा

**श्रीविष्णु :** नारदा, ध्रुवाच्या तपश्चर्येनं संतुष्ट होऊनच मी ह्या ठिकाणीं मुद्दाम प्रकट झालों आहें. ( ध्रुवाजवळ जाऊन ) ध्रुवबाळ !

**ध्रुव :** ( डोळे उघडून ) कोण ? कोण तुम्ही ?

**नारद :** ध्रुवा, तुला दर्शन देण्यासाठीं प्रत्यक्ष परमेश्वर तुझ्यासमोर येऊन उभा राहिला आहे.

**ध्रुव :** ( उठून व श्रीविष्णूला नमस्कार करून ) ईश्वर ? परमेश्वर तुम्ही ? तुम्हांलाच परमेश्वर म्हणतात का ? अहाहा ! परमेश्वरा, तुमच्या दर्शनानं मी धन्य झालों. पण परमेश्वरा, मी लहान आहें हो अजून. तुमचं स्तवन आणि पूजन कसं करावं हें मला नीटसं समजत नाहीं. क्षमा करा मला.

**श्रीविष्णु :** ध्रुवा, माझं स्तवन करण्याची तुला जरूरच नाहीं. केवळ स्तुतिस्तोत्रांनींच मी प्रसन्न होतों, ही समजूत चूक आहे. भक्तीशिवाय ह्या जगांत मला कांहींच प्रिय नाहीं. तुझ्या भक्तीमुळें मी ह्या ठिकाणीं आलों. कोणता वर देऊं तुला ?

**नारद :** ध्रुवा, प्रसन्न झालेल्या परमेश्वराजवळ सिंहासनाचंच वरदान मागून घे.

**ध्रुव :** नको, मला सिंहासन मुळींच नको. राजा होऊन सिंहासनावर बसण्याची माझी इच्छा नाहीं.

**श्रीविष्णु :** पृथ्वीवरचं राजपद नको असेल तर स्वर्गातलं इंद्रपद तुला देतों.

**ध्रुव :** मला इंद्रपदसुद्धा नको.

**************************************************

***********************************************

**नारद :** काय ! मृत्युलोकचं राजपद नको आणि स्वर्गलोकांतलं इंद्रपदही नको ! मग तुला पाहिजे तरी काय ?

**श्रीविष्णु :** *पाहिजे तर तुला स्वतंत्र असं अढळपद देतों.*

**ध्रुव :** देवा, अढळपद द्यायचं असेल तर तें माझ्या आईलाच द्या !

**श्रीविष्णु :** तपश्चर्या केलीस तूं आणि तुझ्या आईला अढळपद काय म्हणून ?

**ध्रुव :** देवा, आईनं माझ्यासाठीं आजपर्यंत अनेक कष्ट सोसले आहेत हो !

**श्रीविष्णु :** स्वतःच्या मुलासाठीं कष्ट सोसणं हें प्रत्येक आईचं कर्तव्यच आहे मुळीं.

**ध्रुव :** मग स्वतःच्या आईसाठीं कष्ट सोसून तिला सुखी करणं हें प्रत्येक मुलाचं कर्तव्य नाहीं वाटतं ? परमेश्वरा, तुम्हांला आई आहे का हो ?

**श्रीविष्णु :** ध्रुवबाळ, हा काय बरं मधेंच चमत्कारिक प्रश्न विचारलास ?

**नारद :** देवा, प्रश्न चमत्कारिक असला तरी अगदीं साधा आहे. ध्रुवाच्या बालवृत्तीला साजेसाच आहे.

**ध्रुव :** देवा, सांगा ना, तुम्हांला आई आहे का ?

**नारद :** बोला, बोला, जगज्जननी ! बोला. आपल्या अनंत ऐश्वर्यांतला हा उणेपणा मोकळ्या मनानं कबूल करा. आहे का तुम्हांला आई ?

**श्रीविष्णु :** ध्रुवबाळ, मला आई नाहीं !

**ध्रुव :** काय ! तुम्हांला आई नाहीं ? देवा, मग आईच्या मायेचा अनुभव तरी तुम्हांला कसा असणार ?

**श्रीविष्णु :** कां बरं ? मातेच्या मंगल रूपानं मीच घरोघर अवतार घेत असतों !

**ध्रुव :** तरीच बरं का ! मी डोळे मिटून तुमचं ध्यान करीत होतों, पण माझ्या डोळ्यांपुढं माझ्या आईचीच प्रेमळ मूर्ति सारखी येत होती ! देवा,